Journal of the Oriental Institute
M. S. University of Baroda
ISSN No. 0030-5324
Impact Factor 7.1
UGC Care Group I

# ऊसतोड कामगारांचे जीवन दर्शन : 'कोयत्यावरचं कोक'

**डॉ. अश्विनी अभिमन भामरे**, मराठी विभाग, श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु. फ. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे

**प्रस्तावना :-**

मराठी साहित्य हे समाजाचे प्रतिरूप मानले जाते. साहित्यातून समाजातील सुख-दुःखांना शब्द मिळतात. जे सामाजिक घटक दुर्लक्षित राहिले आहेत, त्यांना साहित्य मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य करते. असाच एक दुर्लक्षित आणि वंचित घटक म्हणजे ऊसतोड मजूर वर्ग. त्यांच्या व्यथा आणि समस्या फारशा साहित्यात स्थान मिळालेल्या दिसत नाहीत. मात्र अलीकडील काळात काही साहित्यकृती, कादंबऱ्या, कथा, मराठी चित्रपट व लघुपटांच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांचे जीवन शासनदरबारी व समाजासमोर येताना दिसते.

सरदार जाधव यांची *कोयता* ही कादंबरी, डॉ. सुभाष शेकडे यांचे आत्मकथन *हाणला कोयता, झालो मास्तर*, सचिन वसंत यांची *कोयता* ही कथा आणि *कोयता : एक संघर्ष* यांसारख्या चित्रपटांद्वारे ऊसतोड कामगारांचे जीवन वास्तवतः उभे राहिले आहे. सुगीच्या दिवसांत हे कामगार आपले कुटुंब पाठीवर घेऊन गावोगावी फिरत राहतात. त्यांचे घर असते आभाळाखाली तर शय्यास्थान असते शेतातील माती. आपण साखर तोंडात घेतली की तिची गोडी कळते, पण त्या साखरेच्या गोडीमागे असलेले ऊसतोड कामगारांचे जीवन किती कडवट आणि त्रासदायक आहे, हे भयानक वास्तव समाजासमोर येणे नितांत आवश्यक आहे.

**कोयता म्हणजे काय?**

कोयता म्हणजे वीळा, वीळी, कोयत्याचा वापर पीकाची कापणी करण्यासाठी तसेच शेतातील तण काडण्यासाठी केला जातो. या हत्यारात बाकदार पात्याची आतली कड धारदार असते. या धारदार आतल्याकडेचा वार पिकाच्या, तनाच्या, देठांच्या भागावर करून पीक एकाच वेळी छाटून एकत्र गोळा करता येते.[१] माननीय उत्तम कांबळे लिखित 'कोयत्यावरचं कोक' या कादंबरीत ऊसतोड महिलांच्या एका ज्वलंत प्रश्नाला त्यांनी वाचा फोडली आहे. या कादंबरी संदर्भात डॉक्टर मनोहर जाधव म्हणतात की 'कोयता' म्हणजे ऊसतोड कामगार.

'कोयता' हा सांकेतिक शब्द म्हणजे अमुक एका संस्थेने जे कोयते म्हणजे तेवढे मजूर.
कोक म्हणजे गर्भाशय. ऊसतोड कामगार महिलांच्या संदर्भात हा शब्द विशिष्ट अर्थ ध्वनीत करतो'[२]
'कोयत्यावरचं कोक' यात प्रामुख्याने नंदा आणि दत्ताच्या जीवनाभोवती ही कादंबरी फिरते. यात ऊसतोड कामगार म्हणून त्यांचे होणारे शोषण, मुकादम कडून होणारे आर्थिक, मानसीक, शारीरिक शोषण अधिक जाणवते. ऊसतोड कामगारांनी उचल घेतलेली असते. ती परतफेड करावी लागल्याने ऊसतोड कामगार चिंतित असतात. स्त्रीला नैसर्गिक आलेली मासीक पाळी रोजंदारीला अडथळा वाटू लागते. त्यामुळे त्यापुढे जाऊन निसर्गाने मिळालेलं गर्भाशयाचं वरदान तिला नकोसं वाटू लागते. गर्भाशय म्हणजे कोक. ऊसतोड कामगार महिलांना अडथळा वाटू लागतो.[३] त्यामुळे हे गर्भाशयच नको यांची व्यथा सांगणारी 'कोयत्यावरचं कोक' ही कादंबरी भाकरीच्या आड येणारी, कामाच्या आळ येणारी, गर्भाशयाची पिशवी हवीच कशाला?.

कोयता म्हणजे समूह, टोळी, गट दहा बारा जणांची टोळी एकत्र येऊन ट्रक आणि ट्रॅक्टर मध्ये ऊस भरायचं काम करते. ऊस तोडायच काम करते, त्यांना टोळी किंवा कोयता म्हणतात. 'कोयता जगवण्यासाठीच एक मोठं हत्यार असल्यानं माणसाच्या टोळयाही कोयात्याच्या नावानं ओळखल्या जाऊ लागल्या.'[४]

**ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न :**

पोटी आलेल्या पोरांना पुन्हा कोयता दाखवायचा नाही असं नंदाला वाटत असतं म्हणून दत्ताला ती म्हणते की, 'बाई माझ्या पोरांना शिकवणार थोडी मोठी झाली ना त्यांना गावात शाळेला घालणार. ऊस तोडणी दाखवायला त्यांना पुन्हा कधीच आणणार नाही.'[५]

ऊस तोडणी मजुरांच्या नशिबी शिक्षण तर अजिबात नाही म्हणून शिक्षण सर्व ऊसतोड मजुरांच्या मुलाला मिळाले पाहिजे. साखर शाळा नावालाच आहेत. 'सागर गोत पागर म्हणतात की, 'शाळेच्या विद्यार्थ्यांना बेसिक गणिती क्रिया आणि अक्षर ओळख या क्षमता देखील विकसित होत नाही त्यामुळे हळूहळू शिक्षणाच्या स्पर्धेतून, शिक्षणाच्या प्रवाहातून हे विद्यार्थी बाजूला फेकले जातात.[६] शिक्षणाच्या प्रवाहात ऊसतोड मजुरांच्या मुलांना घेऊन येणे ही काळाची गरज आहे.

**अस्वस्थ नंदाची कहाणी :**

नंदा रोजगार बुडतो म्हणून कोक काढायचं ठरवते. त्यासाठी ती डॉक्टरच्या सल्लाही घेते. डॉक्टर कोक काढण्याचे वीस हजार सांगतो हे भयंकर एकूण ती अस्वस्थ होते. त्यात ती वैद्य बाबकडून जडीबुटी औषध घेऊन तब्येत बिगवडते तरीही म्हणते की 'मला येईल का गुण? पिशवी राहील का कायमची रिकामी? राड बंद होईल?'[७]

ऊसतोड मजुरांच्या स्त्रीची ही दयनीय अवस्थेविषयी आजही समाज अनभिज्ञ आहे. निसर्गाने दिलेली देणगी म्हणजे मासिक पाळी आपल्या जगण्यात अडसर ठरते म्हणून तारुण्यातच ती कायमची बंद करण्यासाठीची मानसिकता तयार करते व अशा अनेक ऊसतोड मजूर स्त्रीने आपली गर्भ पिशवी काढून टाकली हेही ते आवर्जून सांगते.

**ऊसतोड मजुरांच्या मागण्या :-**

आधुनिक काळ असल्याने मजुरा ऐवजी यंत्राने ऊसतोड करण्याचा प्रयत्न साखर कारखानदार करतात म्हणून मजुराची पहिली मागणी म्हणजे 'नको नको यंत्र नको, कोयत्या शिवाय काय नको'[८] अशी मागणी मजूर करतात. ऊसतोड मजुरांना किमान दोन हजार रुपये तरी साखर कारखानदारांनी द्यायला पाहिजे. 'जो मजूर ऊस तोडताना कायमचा अधू होतो त्याला उपचारासाठी पैसे द्यायचे आणि पुढे तो जिवंत असेपर्यंत महिन्याला दहा हजार रुपये पेन्शन द्यायची.'[९]

बऱ्याच वेळा ऊसाला आग लागते अनेक मजूर ऊसतोड करतानाच भाजले गेले. ट्रॅक्टरच्या चाकाखाली आले त्यांचा मृत्यू झाला परंतु त्याला कोणतीही भरपाई शासनाने किंवा साखर कारखानदाराने केलेली दिसून येत नाही. आणि कोयता स्त्रीची मागणी मनसुन्न करणारी असते. बऱ्याच महिलांची मागणी असते की, आमच बायाच एक मागणं हाय ते म्हणजे कोक काढायला प्रत्येक बाईला पैसा मिळाला पाहिजे. हि राड बंद केली पाहिजे. ऊसतोड करण्याच्या मार्गात अडथळा निर्माण करणारी आहे म्हणून ती गर्भपिशवीच काढून फेकून दिली पाहिजे अशी भयानक मानसिकता येथील स्त्रीची होताना दिसते आणि ती एकटीची समस्या न होता ती सर्व सार्वजनिक समस्या बनते.

**मुकादमची दादागिरी :**

मुकादमच्या माध्यमातूनच कारखानदार उचल देत असतात. त्यामुळे मुकादमचा अन्याय सहन केल्याशिवाय पर्याय नसतो. उचल दिल्यानंतर ती परतफेड करण्यासाठी तंबी मुकादम देतो. मुकादम म्हणतो 'नाही दिलं तर तुरुंगात टाकेल, तुझी बाई आणून इथं झोपवन.'[१०]

एवढी अन्यायी भाषेत तो बोलत असतो. एवढेच नव्हे तर कोयता स्त्रीवर वाईट नजरही टाकत असतो. 'काय रे चुत्या बाहेर पडलेलं पाखरू बघितलंच वाटतं.'[११] आणि 'समज बघितलंस तर कुणी माझं काय उपटू

शकत नाही तुम्हा सर्वांना मीच जगवतो.'[१२] मुकादम अन्याय ऊसतोड कामगार मजुरांचा दाता जरी असला तरी त्याची कोयता स्त्रीवर अश्लील नजरा असतात.

**'बाहर' चा सोहळा :**

'बाहर' म्हणजे नव्याने मासिक पाळी येणे होय. त्यासाठी गाणीही गायली जातात. उदाहरणार्थ 'गौरीला माझ्या न्हाण आल हो हो हो आलं आलं न्हाण आल हो हिरव्या साडीवर न्हाण आल हो'[१३] 'सवंगडनी माझं न्हाण आज आली. हो हो सखी आज न्हाली बये ग सखी आज न्हाली ताट करुनी मिठाई मेवा एकलीन कैसा खावा तुम्ही मुलांनो याव संगी सवंगडणी माझं न्हाण आज आली हो हो सखी आज न्हाली बये ग सखी आज न्हाली.'[१४]

एकीकडे बाहेरचा सोहळा बाहेरचा सोहळा साजरा केला जातो तर दुसरीकडे ह्याच 'बये आता फळ पिकलं चमकायचं' त्यांचा वास सुटला आहे जपून राहिला पाहिजे.'[१५] या ऊसतोड कामगारांच्या स्त्रीकडे वाईट नजरा अधिक असतात. गावातील दुकानदार सुद्धा वाईट नजर टाकतो. हे झाड आपल्याला कधी मिळेल असं सतत नंदाला बोलत असते फळ पिकले आम्हालाही खायला द्या असं असली तिच्या हावभाव करून ऊसतोड कामगार स्त्रीकडे बघितले जाते. त्यांच्यावर शारीरिक जबरदस्ती केली जाते.

**कोयत्यावरचं कोक मधील नंदाची व्यक्तिरेखा :**

'कोयत्यावरचं कोक' ही कथा प्रामुख्याने नंदाच्या भोवती फिरते.. ही एक ऊसतोड कामगार स्त्री आहे. जिल्हा बीड येथील रहिवासी आई-वडील ही ऊसतोड कामगार या काळात स्थलांतर होणे हे यांचं मोठं दुःख पाचवीलाच पुजलेलं त्यात मुकादम कडून गावातील दुकानदार सारखी धन दांडगे यांच्यापासून बचाव करणारी नंदा. नंदा आपल्या नवऱ्यासोबत कोयता म्हणून उभी राहते. रोजंदारी बोलणार नाही म्हणून पाळी येणे तिला अडथळा वाटू लागते. वीस वर्षाची नंदाला दोन मुले जुळे असतात पण उचल अधिक झाल्याने मुकादमाचे पैसे फेडायची या विचाराने ती पोटातील निसर्गनिर्मित कोक म्हणजे गर्भपिशवीच काढून फेकली पाहिजे नाहीतरी त्याचा आता काय उपयोग. महिनाभरात येणारी ही राड म्हणजे मासिक पाळी गरिबांच्या जीवन जगण्यात अडथळा निर्माण करणारी अवस्था म्हणून कर्ज काढून सुद्धा कोक काढून फेकून देण्यासाठीची तिची धडपड मनाला सुंदर करणारी आहे.

शेवटी वैद्य बापूंचे औषध घेत त्यात तिची किडनी फेल होणं, डायबिटीस व बीपी सारखे आजार त्यातून निर्माण होणे व शेवटी मरण यांना ही शोकांतिका या नंदाच्या नशिबी दिसून येते. ही कथा एकट्या नंदाची नसून संपूर्ण ऊसतोड कामगार स्त्रीची शोकांतिका आहे.

**कोयत्यावरचं कोक मधील दत्तूची व्यक्तिरेखा :**

दत्तू हा नंदाचा नवरा, एक ऊसतोड कामगार, वाघासारखा दिपाड, दत्ता कुटुंबप्रमुख म्हणून भूमिका पार पाडतो. डॉक्टर मनोहर जाधव म्हणतात की, 'झोपडी बाहेर बसलेल्या दत्ताला जर विडी प्यायची असेल तर तो नंदाला ती पेटवून आणायला सांगतो पेटल्याची खात्री करून मंग दत्ताला देते किंवा झोपडी बाहेर संध्याकाळी आता पीत बसलेला असेल तर नंदा त्याला तिथेच ताट वाढून आणते या प्रसंगातून त्यांच्या सह जीवनातील सामंजस्य आणि प्रेम लेखकाने चित्रित केले आहे.'[१६] दत्ता नंदाची कोक काढण्यासाठी मूकसंमती देतो. नंदावर नितांत प्रेम करणारे व्यक्तिमत्व शेवटपर्यंत नंदाच्या आरोग्यासाठी चित्रित असणारा दत्तू शेवटी नंदापुढे हारते नंदाची ही शोकांतिका या ठिकाणी ती दिसून येते.

**कोयत्यावरचं कोक मधील भाषाशैली :**

कोयत्यावरचं कोक मधील भाषा ही मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील आहे. उदाहरणार्थ नंदे, नाड कशाला म्हणतेयस? रगतलाच राडी सारखं दिसते न्हव राड नाही तर काय सोन म्हणायचं का? नंदा म्हणाली'[१७] राड म्हणजे मासिक पाळी असे अनेक नवीन नवीन शब्द कादंबरी येतात.

**समारोप :**

"कोयत्यावरचा कोक" या लेखातून लेखक उत्तम कांबळे ऊसतोड कामगार महिलांच्या जिव्हाळ्याच्या आणि जीवघेण्या वास्तवावर प्रकाश टाकतात. ते म्हणतात की, *"उसाच्या फडात जाऊन अंगभर जखमा घेत ऊस तोडताना मासिक पाळीच्या काळात चार दिवस रोजगार हुकू नये, भाकरी गुडघ्यात मान घालून बसावी लागू नये म्हणून 'कोक' म्हणजे गर्भाशयच काढून टाकण्याची भीषण प्रवृत्ती काही जिल्ह्यांत तयार झाली आहे."* मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ही प्रवृत्ती रोगासारखी पसरली असून सुमारे पंधरा हजार महिलांचे गर्भाशय काढण्यात आले आहे. *भाकरी आणि रोजगार यांच्यामध्ये गर्भाशय हा अडथळा वाटू लागला आहे,* अशी ही अत्यंत धोकादायक मानसिकता तयार झाली आहे. काही महिलांना वाटते की, प्रसूतीचा, पाळीचा त्रास नाहीसा केला की रोजगार अधिक सुलभ होईल — आणि त्यामुळे 'कोक' ही त्यांच्यासाठी जणू बाधा ठरते. फक्त उदरनिर्वाह, पोटाची खळगी भरावी, मुलांना जगवावं — एवढीच माफक अपेक्षा बाळगणाऱ्या या महिला मजुरांचे आयुष्य हे *शोषण, असुरक्षितता आणि व्यवस्थेच्या बेपर्वाईचा बळी* ठरले आहे. ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांच्या जोडीला आज *'कोयता'* असे नाव मिळाले आहे. पण हाच कोयता त्यांच्या जीवनात गर्भाशय गमावण्याचे संकट घेऊन येतो — हे वास्तव मन हेलावून टाकणारे आहे.

नंदा आणि दत्तू या दांपत्याची ही कहाणी केवळ एका कुटुंबाची नाही, तर ही *शेकडो स्त्रियांची सामूहिक शोकांतिका* आहे, जी *सामाजिक प्रश्न* बनून समोर येते. उत्तम कांबळे सरांनी या भीषण प्रश्नाची *वेदनादायक मांडणी* करत शासन व समाजाच्या दरबारात या समस्येचे गांभीर्य मांडले आहे. ही एक सामाजिक स्फोटकता आहे, जी केवळ चर्चेपुरती न राहता *धोरणात्मक उपायांची* मागणी करते.

**निष्कर्ष :**

१. ऊसतोड मजुरांचे जीवन, त्यांचे प्रश्न, संघर्ष व व्यथा हे एक स्वतंत्र सामाजिक प्रश्न म्हणून मान्य झाले आहेत. हे विषय शासनाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत मांडले गेले.

२. ऊसतोड स्त्रियांमध्ये मासिक पाळीमुळे काम चुकू नये म्हणून निसर्गनिर्मित गर्भपिशवी (कोख) काढून टाकण्याची जी मानसिकता तयार झाली होती, ती आता बदलू लागली आहे. जागृतीमुळे स्त्रिया आपले आरोग्य आणि हक्क यांचा पुनर्विचार करू लागल्या आहेत.

३. विटाळामुळे स्त्रीला अस्पृश्य ठरवणे, नोकरीपासून वंचित ठेवणे ही प्रथा संपुष्टात येईल, अशी अपेक्षा होती. परंतु अद्याप समाजात हे पूर्णतः घडलेले नाही. लेखकाने ही कटू सत्यता समाजासमोर उभी केली आहे.

४. मासिक पाळीच्या काळात कामावर परिणाम होऊ नये म्हणून गर्भपिशवी काढून टाकण्याचा निर्णय घेणाऱ्या स्त्रियांमुळे तयार झालेली सामाजिक समस्या गंभीर आहे. यावर वैद्यकीय सेवा, आरोग्य साक्षरता व विश्रांतीच्या सुविधा यांसारख्या उपाययोजना सुचवण्यात आल्या.

५. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी ऊस कारखान्यांच्या माध्यमातून 'साखर शाळा' सुरू करण्यात आल्या, ज्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा पाया मजबूत होऊ लागला. ऊसतोड मजुरांवर अन्याय करणाऱ्या मुकादमांची अरेरावी आणि शोषणाची वृत्ती उघडकीस आल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

६. ऊसतोड मजुरांच्या आरोग्याच्या गंभीर समस्यांबाबत जनजागृती झाल्याने शासन यंत्रणा या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहू लागली आणि काही ठिकाणी आरोग्य तपासणी, रुग्णसेवा इ. सुविधा सुरू झाल्या. ऊसतोड मजुरांच्या विविध मागण्यांसाठी काम करणाऱ्या संघटना जागृत झाल्या. या संघटनांनी त्यांच्या हक्कांसाठी सामूहिक आवाज उभारला.

७. ऊसतोड कामगारांच्या निवृत्त आयुष्यासाठी निवारा मिळावा म्हणून त्यांच्यासाठी घरकुल योजना राबवण्याची सुरुवात झाली. कोख म्हणजे गर्भपिशवी ही निसर्गनिर्मित देणगी आहे आणि ती अडथळा नाही, ही समजत वाढू लागली आहे. आरोग्य आणि स्त्रीत्वाबाबतचा नवा दृष्टिकोन निर्माण होत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. www.koyta.co.in_कोयता विकिपीडिया
२. कोयतावरच कोक - उत्तम कांबळे लोक वांग्मय गृह पृष्ठ क्रमांक चार प्रस्तावना
३. तत्रैव, मनोगत......
४. तत्रैव, पृष्ठ क्रमांक, ३७
५. maxblock.maharashtra.com (ऊसतोड कामगारांची मुलं) १५/१२/२०२१
६. कोयत्या वरचा कोक उत्तम कांबळे लोक वांग्मय गृह प्रकाशन, पृष्ठ क्रमांक, ४४
७. तत्रैव, पृष्ठ क्रमांक, ५५
८. तत्रैव पृष्ठ क्रमांक, ५७
९. तत्रैव पृष्ठ क्रमांक, ७४
१०. तत्रैव पृष्ठ क्रमांक, ९२
११. तत्रैव पृष्ठ क्रमांक, १२
१२. तत्रैव पृष्ठ क्रमांक, ८४
१३. तत्रैव पृष्ठ क्रमांक, ८७
१४. तत्रैव, प्रस्तावना
१५. तत्रैव, पृष्ठ क्रमांक, ७९
१६. मुखपृष्ठ....
१७. मुखपृष्ठ....